जा.क्र.मसंकें/प्रअवा/3517/584/२०२२,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी,
दिनांक 06 DEC 2022
07 DEC 2022

प्रति,
मा.प्रभारी अधिकारी,
कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

**विषय:— मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभागातील रोपवाटीका व प्रक्षेत्र व्यवस्थापन (काजू बागेतील कामे करणे) करण्यासाठी कंत्राटी "प्रक्षेत्र सहाय्यक" भरणेसाठीची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दी करणेबाबत...**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभाग येथे रोपवाटीका व प्रक्षेत्र व्यवस्थापन (काजू बागेतील कामे करणे) करण्यासाठी कंत्राटी "प्रक्षेत्र सहाय्य हे पद कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात भरावयाचे आहे. याकरिता सदर पदाची जाहिरात विद्यापीठ संकेतस्थळावर **(www.dbskkv.org)** प्रसिध्द करावी.

**सोबत:—वरीलप्रमाणे**

7/12/2022

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

Scanned by CamScanner

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (४१५७११)
"वाकवली विभाग"
ता.दापोली, जि.रत्नागिरी.

3518

जा.क्र.मसंके/प्रअवा/585 /२०२२.

दिनांक :–
06 DEC 2022
07 DEC 2022

# जाहिर नोटीस

मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत वाकवली विभाग प्रक्षेत्रावरील रोपवाटीका व प्रक्षेत्र व्यवस्थापन त्यामध्ये काजू WMS टेकडी व हायब्रीड काजूमधील झाडी–झुडूपे तोडणे, तोडलेली झाडी–झुडूपे एकत्र गोळा करणे ही कामे मजुर लावून करून घेण्यात येणार आहेत. सदर कामे करून घेण्यासाठी कंत्राटी "प्रक्षेत्र सहाय्यक" नेमणे या विभागाला आवश्यक आहे. रोपवाटीका व प्रक्षेत्र व्यवस्थापन (काजू बागेतील) संदर्भात करावयाच्या कामाचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १) | • **नर्सरीतील कामे:–**<br>नारळ नर्सरीतील गवत काढणे, नारळ रोपांना खताची मात्रा देणे, नारळ रोपांना स्प्रिंक्लरने नियमित पाणी देणे, स्प्रिंक्लर साफ–सफाई व दुरूस्ती काम करणे. |
| २) | फणस, जांभूळ, करवंद, कोकम, इत्यादी रोपांना खताची मात्रा देणे, नारळ रोपांना स्प्रिंक्लरने नियमित पाणी देणे. |
| ३) | सुपारी श्रीवर्धनी रोपांमधील गवत काढणे, रोपांना खताची मात्रा देणे व रोपांना नियमित स्प्रिंक्लरने पाणी देणे |
| ४) | • **प्रक्षेत्रावरील कामे:–**<br>नारळ बागेतील साफ–सफाई काम करणे,झाडांना नियमित स्प्रिंक्लरने पाणी देणे. |
| ५) | नारळ बागेतील फळे गोळा करणे, पडलेली झापे जमा करून एका ठिकाणी गोळा करणे. |
| ६) | काजू बाग WMS टेकडी,हायब्रीड काजूतील झुडूपे तोडणे, तोडलेली झुडूपे एका ठिकाणी गोळा करणे, वरीलप्रमाणे सर्व कामे मजुरांकडून करून घेणे तसेच मा.प्रभारी अधिकारी यांच्या सुचनेनुसार कामे करणे. |

वरीलप्रमाणे कामे कंत्राटी पध्दतीने प्रक्षेत्र सहाय्यक नेमून माहे जानेवारी २०२३ ते मार्च २०२३ या तीन महिन्याच्या कालावधीत करावयाची आहेत. सदर कामासाठी प्रती महिना एकत्रित वेतनाचे दरपत्रक (अर्ज) नमुद करण्यात यावे. तरी रोपवाटीका व प्रक्षेत्र व्यवस्थापन (काजू बागेतील) कामे करून घेण्यासाठी कृषि पदविका/कृषि पदवी प्रमाणपत्रधारक इच्छूकांनी कंत्राटी अर्ज दिनांक २०/१२/२०२२ पर्यंत या कार्यालयास पोहोचतील असे पाठवावे. लखोट्यावर **वाकवली विभागातील रोपवाटीका व प्रक्षेत्र व्यवस्थापन (काजू बागेतील कामे) करण्यासाठी कंत्राटी "प्रक्षेत्र सहाय्यक" पदासाठीचा अर्ज.** असे लिहून मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली (वाकवली विभाग) ता. दापोली जि. रत्नागिरी या पत्त्यावर पोष्टाद्वारे पाठवावे.

**"प्रक्षेत्र सहाय्यक" या पदासाठी आवश्यक अर्हता:–**

- उमेदवार हा कृषि पद्विका/कृषि पदवीधर या शाखेतील पदवीधर असावा.
- **MS-CIT** संगणकीय हाताळणी कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- कृषि पद्विका/कृषि पदवीधारक उमेदवाराचे उत्तीर्ण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- विद्यापीठीय प्रक्षेत्रावरील "प्रक्षेत्र सहाय्यक" कामकाजाचा अनुभव असावा.

(PTO)

Scanned by CamScanner

ठिकाण :—वाकवली.
दिनांक :— 06 DEC 2022

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत, माहिती व प्रसिध्दीसाठी.....

१. ग्रामपंचायत कार्यालय, वाकवली, पांगारी, टेटवली,कुंभवे, सुखदर,ता.दापोली/खेड.
२. सुचना फलक, संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
३. सुचना फलक, भा.सु.यो, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.
४. सुचना फलक, कंदपिके संशोधन योजना, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली.

**उपरोक्त पद भरण्यासाठी नियम व अटी खालीलप्रमाणे आहेत**

१ उपरोक्त पदांसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांची वयोमर्यादाही खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ३८ वर्षे आणि मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी १८ ते ४२ वर्षे अशी राहिल.

२ सदर कामे ही सन २०२२—२३ या कालावधी करीता राहतील. कार्यालयीन कामकाजाचे स्वरुप पाहून सदर कामे चालू ठेवण्यात येतील अथवा कोणतेही कारण न देता केव्हांही सदर ठेका समाप्त केला जाईल.

३ सदरची कंत्राटी नियुक्ती कामाचा उरक आणि अचुकता इत्यादी बाबी समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील असा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदरची कंत्राटी नियुक्ती रद्द करण्यात येईल.

४ संबंधित उमेदवाराला कंत्राटी नियुक्ती संपण्यापूर्वी सदर कंत्राटी नियुक्ती रद्द करावयाची असल्यास त्याने तशी १ महिना आगाऊ सूचना देणे आवश्यक आहे. जर तशी आगाऊ सूचना न दिल्यास संबंधितांकडून एक महिन्याचा मेहनताना भरणे आवश्यक आहे. आणि अशा व्यक्तीची कंत्राटी नियुक्ती भविष्यात केली जाणार नाही.

५ सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी—५४४३/९० निर्णयाच्या अनुषंगाने या कंत्राटी नियुक्ती कालावधीनंतर विद्यापीठसेवेत कायमस्वरुपी नोकरी मिळण्याबाबत हक्क राहणार नाही.

६ कंत्राटी नियुक्ती पध्दतीच्या अटी व शर्ती मान्य असल्यास त्याप्रमाणे हमीपत्र रुपये १००/— च्या स्टॅम्पपेपरवर लिहून देऊन सादर करावे.

७ कामाची आदायगी महिन्यातून एक वेळी करणेत येईल. त्यासाठी केलेल्या कामाचे बील सादर करावे लागेल. सदर रक्कम बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

८ वरील प्रमाणे काम करणेचे प्रति महादर नमूद करावे.

९ अर्धवट काम सोडल्यास किंवा काम अपूर्ण असल्यास बीलांची आदायगी होणार नाही व आपले नाव पुढील कामाच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही.

१० वरीलप्रमाणे नमुद केलेली सर्व कामे माहे नोव्हेंबर २०२२ ते मार्च २०२३ या (पाच महिन्याच्या) कालावधीत कार्यालयीन वेळेत करावयाचे आहेत.

११ याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांनी राखून ठेवलेले आहेत.

१२ सदरचे कंत्राटी काम करत असताना प्रक्षेत्र आणि कार्यालय दोन्ही ठिकाणचे कार्यालयीन शिष्टाचार पाळणे बंधनकारक आहे.

Scanned by CamScanner

१३ उपरोक्त कंत्राटी पदाची मुलाखती घेवून नियुक्ती देण्यात येणार असून मुलाखतीची तारीख आपणास कळविण्यात येईल.

१४ पोष्ट टपाल वाटपामधील उशिराबाबत हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

ठिकाण :—वाकवली.

दिनांक :— 0 6 DEC 2022

6/12/2022

संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी.

Scanned by CamScanner

श्री ......................................................
......................................................
......................................................

दिनांक / /२०२२.

प्रति,

मा.संचालक,

मध्यवती संशोधन केंद्र, वाकवली,

ता.दापोली, जि.रत्नागिरी.

विषय :– कंत्राटी पध्दतीने वाकवली विभागातील रोपवाटीकेत व प्रक्षेत्र व्यवस्थापन (काजू बागेतील कामे करणे) याकरिता कंत्राटी “प्रक्षेत्र सहाय्यक” नेमणेबाबत....

संदर्भ :– जा.क्र. मसंके/प्रअवा/ /२०२२, दिनांक

महोदय,

उपरोक्त संदर्भिय नोटीसीद्वारे मी मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली अंतर्गत वाकवली विभागातील रोपवाटीकेत व प्रक्षेत्र व्यवस्थापन (काजू बागेतील कामे करणे) यासाठी कंत्राटी “प्रक्षेत्र सहाय्यक” या पदावर काम करण्यास मी तयार असून मला प्रतीमहा कमीत कमी रु...... मिळण्यास विनंती करीत आहे. तरी, माझी माहिति खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ➢ | पूर्णनांव | |
| ➢ | पत्ता | |
| ➢ | शैक्षणिक पात्रता | |
| ➢ | जन्मतारीख | |
| ➢ | पूर्ण वय | |
| ➢ | अनुभव | |
| ➢ | इतर शैक्षणिक अर्हता | |

तरी, वर नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती सोबत जोडल्या आहेत. तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन माझी कंत्राटी “प्रक्षेत्र सहाय्यक” पदावर आपल्या कार्यालयात कंत्राटी पध्दतीने नेमणूक होण्यास विनंती आहे. संदर्भिय नोटीसमध्ये समाविष्ट असलेल्या सर्व अटी व शर्ती मला बंधनकारक आहेत.

तरी, माझी प्रक्षेत्र सहाय्यक पदावर नेमणूक होण्यास विनंती आहे.

मे. कळावे,

आपला विश्वासू,

Scanned by CamScanner